विदेश दौ-यांचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठवितेवेळी अनावश्यक विलंब टाळण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: सीडीआर-1096/प्रकरण-23/96/अकरा,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 22 मे, 1996.

वाचा :- (1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-1191/191/4/91/अकरा, दिनांक 8 फेब्रुवारी, 1991.

(2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-1094/प्रकरण/8/94/अकरा, दिनांक 30 मार्च, 1994.

(3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-1096/87/प्रकरण-4/96/अकरा, दिनांक 6 एप्रिल, 1996.

## प रि प त्र क

शासकीय अधिकारी तसेच मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम इत्यादींमधील अधिका-यांच्या विदेश दौ-याबाबतचे प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र शासनास पाठविण्याच्या अनुषंगाने उपरोक्त दिनांक 8 फेब्रुवारी,1991 च्या आदेशान्वये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, केंद्र शासनाच्या परवानगीसाठीचा प्रस्ताव प्रस्तावित विदेश दौ-याच्या किमान तीन आठवडे आधी पाठविणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाची संमती गृहीत धरून विदेश दौरा करण्यात येऊ नये. या सूचनांचा पुनरुच्चार दिनांक 30 मार्च, 1994 च्या आदेशान्वये करण्यात आला आहे. तसेच अशा प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक शिफारस समिती उपरोक्त दिनांक 6 एप्रिल, 1996 च्या आदेशानुसार नेमण्यात आली आहे.

तथापि, प्रशिक्षण चर्चासत्र, परिषद यांना उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनास विहित मुदतीत प्रस्ताव पाठविला गेला नाही तर शासकीय अधिकारी तसेच मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांच्यातील अधिकारी यांचा न्याय्य हक्क हिरावून घेतला जाण्याची व परिणामी संबंधित अधिका-यावर विनाकारण अन्याय होण्याची शक्यता असते. अशी शक्यता उद्भवू नये यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग तसेच विभाग प्रमुख यांनी विदेश दौ-याबाबतचे सर्व प्रस्ताव विहित मुदतीत हाताळण्याची व शिफारस समितीस तसेच केंद्र शासनास पाठविण्याची दक्षता घ्यावी. जर एखाद्या प्रकरणात एखाद्या अधिका-याची न्याय्य संधी हिरावली गेल्याचे आढळून आल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर व कार्यालय प्रमुखावर उचित कार्यवाही करणे आवश्यक राहील याचीही नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. द. कासार,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.